# मेट्रोचे विमानतळाजवळचे भुयार उघडले

## वैनगंगा टीबीएमने केला ३१८ दिवसांचा प्रवास

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) – मुंबईच्या भूगर्भातील बेसाल्ट, ब्रेशिया अशा प्रकारचे कठीण खडक फोडत मेट्रो रेल्वेची 'वैनगंगा-३' ही टीबीएम मशीन मरोळ नाक्यावरील पाली ग्राऊंड येथून ३१८ दिवसांनंतर आज छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचली. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या पॅकेज ७ मधील भुयारीकरणाचा हा तिसरा टप्पा होता. 'वैनगंगा-३' टनेल बोअरिंग मशीनने पॅकेज ७ मधील डाऊन मार्गावर ९३७ आरसीसी सिमेंट रिंग्सचा वापर करत हा १.३१ किलोमीटरचा टप्पा गाठला. १५० अभियंते, तंत्रज्ञ आणि कुशल कामगार यांनी २ एप्रिल २०१८ पासून हे काम सुरू केले होते. ९२ मीटर लांबीच्या या टीबीएम मशीनने रोज ४.१२ मीटर भुयारीकरण केले. मेट्रो-१ आणि सहार उन्नत मार्गाखालून हे भुयार गेले आहे. मुंबई मेट्रो रेल महामंडळाने मेट्रो-३ प्रकल्पातील ५२ किलोमीटर भुयारीकरणापैकी २० किलोमीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

---

मुंबई मेट्रो रेल महामंडळाने आज यशाचा आणखी एक टप्पा गाठला. मेट्रोचे-३ चे पॅकेज ७ हे मरोळ नाका येथे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो-१ ला आणि जेव्हीएलआर येथे प्रस्तावित स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-कांजुरमार्ग-विक्रोळी या मेट्रो-६ ला जोडणार आहे.

■ अश्विनी भिडे, व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल महामंडळ.



# विमानतळाजवळ उघडले मेट्रोचे भुयार

मुंबईच्या भूगर्भातील बेसाल्ट, ब्रेशिया अशा प्रकारचे कठीण खडक फोडत गुर्रर करत मेट्रो रेल्वेची 'वैनगंगा-३' ही टीबीएम मशीन मरोळ नाक्यावरील पाती ग्राऊंड येथून ३१८ दिवसांनंतर बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचली. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या पॅकेज ७ मधील भुयारीकरणाचा हा तिसरा टप्पा होता.

(छाया : सचिन वैद्य)

▪ सविस्तर वृत्त पान ३

